केंद्र शासनाची अहिंदी राज्यातील विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेनंतर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी भारत सरकारने हिंदी शिष्यवृत्ती (ऑफलाईन पध्दतीने)

| अ. क्र. | योजना | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | **अहिंदी भाषीक राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी हिंदी शिष्यवृत्ती.** |
| २ | योजने बद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय सन १९८४-८५ अन्वये. अहिंदी राज्यातील विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेनंतर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी भारत सरकारने सन १९८४-८५ या शैक्षणिक वर्षापासून सदरची शिष्यवृत्ती सुरु केलेली आहे . |
| ३ | योजनेचा प्रकार/स्वरुप | अहिंदी राज्यातील विद्यार्थ्याना हिंदी भाषेचे ज्ञान व्हावे या हेतुने या शिष्यवृत्तीचे प्रयोजन शिष्यवृत्ती मंजूर करण्यामागे प्रस्तुत केलेले आहे. ज्या विद्यार्थ्यांची मातृभाषा हिंदी नाही अशा राज्यांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजुर केली जाते. |
| ४ | योजनेचा उद्देश | अहिंदी राज्यातील विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेनंतर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | शासनाने एकुण २५५ संच निर्धीरीत सर्व **अहिंदी भाषीक** विद्यार्थ्यांनासाठी केले आहे. |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १) १. या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची मर्यादा नाही.<br>२. मागील वार्षिक परीक्षेत किमान ६० टक्के गुण आवश्यक आहेत.<br>३.विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | १. माध्यमीक शालांत परीक्षा व उच्च माध्यमीक परीक्षा उत्तीर्ण असलेबाबतचे प्रमाणपत्र.<br>२. बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.<br>३. नुतनीकरणासाठी मागील वर्षाची पास झालेची गुणपत्रीका. |
| ८ | दिल्या जाणाया लाभाचे स्वरुप | ११ वी १२ प्रतिवर्ष -३०००/- पदवीसाठी- प्रतिवर्ष ५०००/- पदव्युत्तरस्तरसाठी – प्रतिवर्ष १००००/- सदर रक्कम ही भारतीय स्टेट बँक ऑफ ईडिया पुणे कोषागार शाखा,पुणे यांचामार्फत विद्यार्थ्यांचे बँक खातेवर थेट (NFT) जमा करण्यात येते. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीनमंजूरी/नुतनिकरणसाठी ऑफलाईन अर्ज स्विकारण्यात येतात. ज्या विद्यार्थ्यांस नवीन (Fresh) शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे अशा विद्यार्थ्यांना पुढील वर्षाचे अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेनंतर नुतनीकरणाचा अर्ज करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयामार्फत संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे. |
| १० | अंदाजे प्रक्रियेला लागणारा वेळ | विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयामार्फत संचालनालयास माहे सप्टेंबर पर्यंत येने आवश्क आहे. सदर अर्जाची छाननी होऊन शिष्यवृत्तीची रक्कम माहे एप्रिल मध्ये विद्यार्थ्यांना थेट त्यांचे खातेवर वितरीत होते.<br>(कालावधी : जुन ते एप्रिल – ९ ते १० महिने) |
| ११<br>१२ | संपर्क कार्यालयाचे नाव व पत्ता<br>ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, ससून सर्वोपचार रुग्णालयाजवळ, पुणे स्टेशन, पुणे -४११ ००१.<br>ऑफलाईन पध्दतीने. |